अर्ज आदेश (१) नियमीत दिवाणी दावा क्रमांक **४६/२०१४**
**नि.क्र.१४६/(ड)** संतोष छगन गांधी वि. मंदाकिनी गांधी + २२

**<u>अर्ज निशाणी क्रमांक १४६ वर आदेश</u>**

(पारीत केल्याचा दिनांक **१३ माहे नोव्हेंबर, २०१८**)

(सी. एन्. आर. क्रमांक :एम्.एच्.आर.जी.०९०००१८०२०१४)

**०१)** मयत वादीच्या वारस मुलीने प्रस्तुत अर्ज ***<u>दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा क्रम २२ नियम ०३</u>*** नुसार वारस म्हणून तिला वादीपणात सामील करुन घेण्यासाठी दाखल केला आहे.

**०२)** वादीचा मृत्यू दिनांक **१५.१०.२०१७** रोजी झाला आहे. वादीने ठराव व निरंतर ताकीदीसाठी दावा दाखल केला आहे. वादीचे वारस दावा पुढे चालवू ईच्छीत आहेत म्हणून त्यांची नावे अभिलेखावर वादीपणात घेण्याची विनंती केली.

**०३)** प्रतिवादीने प्रस्तावीत वारसाने ती वारस असल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही, म्हणून अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

**०४)** वादीच्या वारसांतर्फे विधीज्ञ सौ. एम्. एन्. मनोहर व प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री. एन्. जी. देशमुख यांचा युक्तीवाद ऐकला.

**०५)** दिवाणी हक्कांच्या अंमलबजावणीसाठी मृतक वादीच्या वारसांना हक्क अस्तित्वात राहत असेल तर ते दावा पुढे चालवू शकतात. वादीने दिवाणी स्वरुपाचा हक्काच्या अंमलबजावणीसाठी दावा दाखल केला असून सदर हक्क वादीच्या वारसांना जिवंत राहत आहे.

**०६)** वादीच्या वारस मुलीने तिला वादीचा वारस म्हणून अभिलेखावर घेण्यासाठी ***<u>दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा क्रम ०६ नियम १७</u>*** अनुसार दाखल केलेला अर्ज **<u>नि.क.१४०</u>** योग्य तरतुदीनुसार दाखल न केल्यामुळे नामंजूर केला आहे. म्हणून मृतक वादीच्या ऐवजी त्याच्या वारस मुलीला वादपत्राच्या सरनाम्यात वादीपणात सामील करता येईल. म्हणून अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आ दे श</u>**

**०१.** अर्ज **<u>नि.क.१४६</u>** मंजूर करण्यात येतो.

**०२.** मृतक वादीच्या ऐवजी त्याचे वारस म्हणून अर्जदार सौ. संजाली सागर गांधी हिला वादपत्राच्या सरनाम्यात वादीपणात सामील करण्यास परवानगी देण्यात येते.

**०३.** दोन्ही पक्षांनी आपआपला खर्च सोसावा.

**---स्वाक्षरी---**
**(सुभाष लक्ष्मण फुले)**
**(एम एच आर जी ०००९ - २१२५)**
**दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, रोहा.**
**जिल्हा रायगड.**

**स्थळ : रोहा.**
**दिनांक : १३.११.२०१८.**